# -व्यवस्थापन परिषद सभेचा कार्यवृत्तांत -

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची सभा शुक्रवार दि.०७/११/०८ रोजी दुपारी १-०० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बी. पी. बंडगर - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | ॲड. रामदास पी. सब्बन | सदस्य |
| ३) | शिक्षण संचालक पुणे यांचे प्रतिनिधी शिक्षण सहसंचालक कोल्हापूर डॉ. बी. बी. कदम | सदस्य |
| ४) | डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ५) | प्रा. डॉ. आर. एन. शेंडगे, संचालक, म. व वि.वि.मं. - पदसिध्द | सदस्य |
| ६) | प्राचार्य जे. के. बिले | सदस्य |
| ७) | श्री. पी. एम. हिरेमठ | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ९) | श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| १०) | श्रीमती एन. व्ही साठे | सदस्या |
| ११) | प्रा. बी. पी. रोंगे | सदस्य |
| १२) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| १३) | श्रीमती मिनाक्षी सुभाष कदम | सदस्या |
| १३) | डॉ.पी.बी.जोशी - प्र. वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १४) | डॉ. एम. एस. शेजूळ - प्र. परीक्षा नियंत्रक तथा कुलसचिव | स्थायी निमंत्रित तथा सचिव |

सभेच्या सुरुवातीला मा.सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष व सदस्य यांचे स्वागत केले. सर्वप्रथम व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस मा. श्री. जयसिंह मोहिते-पाटील यांनी पत्राद्वारे अनुपस्थित रहाणार असल्याचे कळविले याची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य श्री. पी. एम. हिरेमठ यांच्या मातोश्रीचे वार्धक्याने दि.०६/११/२००८ रोजी निधन झाल्यामुळे त्यांच्या आत्म्यास श्रध्दांजली वाहण्यात आली. व्यवस्थापन परिषदेचे मान्यवर सदस्य प्रा. व्ही. तिरुपती व श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे नियत वयोमानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांना पुढील व्यवस्थापन परिषदेच्या सभेत बोलावून त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्याचे ठरले. यासाठी प्रा. व्ही. तिरुपती व श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे यांना पत्र पाठवावे असेही ठरले.

सभेच्या कार्यक्रमपत्रिकेपूर्वी दि.०४/०९/२००८ रोजी झालेल्या सभेतील ठरावावर कार्यवाही करण्यात आलेल्या कार्यपूर्ती अहवालाचे मा. कुलसचिव यांनी वाचन केले. यामध्ये खालील दुरुस्त्या सुचविण्यात आल्या.

१) विषय क्र. १ व २ मध्ये, "कार्यवाही झालेली आहे" ऐवजी "-- " करावे.

२) विषय क्र. ६ वर केलेल्या कार्यवाहीच्या माहितीमध्ये, "शासनास" अशी दुरुस्ती करावी.

कार्यक्रमपत्रिकेप्रमाणे सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**विषय क्र. १ दि.०४ सप्टेंबर, २००८ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव क्र.१ दि.०४ सप्टेंबर, २००८ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून खालील दुरुस्त्यासंह कायम करण्यात आला.**

**१) पान क्र. २ वर, "श्री. पी. आर. हिरेमठ" ऐवजी "श्री. पी. एम. हिरेमठ" अशी दुरुस्ती करावी.**

**२) पान क्र. ४ वर, विषय क्र. ४ वरील विषयामध्ये "देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ" ऐवजी "देण्याबाबतच्या शिफारशी विचारार्थ" अशी दुरुस्ती करावी.**

**३) पान क्र. ९ वर, ठराव क्र. ९(४) मध्ये, "विद्यापीठात जे कर्मचारी कायम पदावर कार्यरत आहेत आणि त्यांची विद्यापीठातच इतर पदावर नियुक्ती झालेली आहे त्यांना त्यांच्या विनंती पत्रानुसार धारणाधिकार (Lien) देण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली" याऐवजी "विद्यापीठात श्री. हुळ्ळे डी. एस. भांडारपाल पदावर कार्यरत आहेत आणि त्यांची विद्यापीठाच्या अधीक्षक पदावर नियुक्ती झाली आहे त्यांना त्यांच्या विनंतीपत्रानुसार धारणाधिकार (Lien) देण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली" अशी दुरुस्ती करावी.**

**४) पुढील सभेपासून व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत मा.अध्यक्षांच्या सहीचा देण्यात यावा असे ठरले.**

**विषय क्र. २ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा. कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

**( सोबत अहवाल जोडला आहे.)**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव क्र. २** **मा.कुलगुरु यांच्या अहवालामध्ये, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या माहितीमध्ये, "परिनियम ३७१ प्रमाणे मान्यता काढून घेण्याची कार्यवाही केलेली आहे" याऐवजी "परिनियम ३७१ प्रमाणे मान्यता काढून घेण्याची कार्यवाही चालू आहे " या दुरुस्तीसह मा. कुलगुरु यांनी सादर केलेला अहवाल व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ३** **विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमासाठी शुल्क सुधारणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: जून २००८ पासून विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमाचे शुल्क ठरविण्यासाठी विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेने प्राचार्य जे. के. बिले यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. सदरच्या समितीने विविध अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चितीसाठी बैठक दिनांक २८-०८-२००८ रोजी घेतली आहे. सदरच्या बैठकीचा अहवाल सोबत जोडला आहे. सदरचे शुल्क व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५३ (ii) व ५४(१) अन्वये सदरच्या शुल्काचा Ordinance तयार करुन त्यास मा.कुलपती तथा राज्यपाल यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सदरचा Ordinance तयार करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ३** **विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमासाठी शुल्क सुधारण्याबाबतच्या प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ४** **प्रा.व्ही.तिरुपती अहवालामध्ये ज्या व्यक्तींवर सदर अहवालामध्ये कारवाई करण्याची शिफारस केलेली होती त्यांना मा.कुलगुरुमहोदयांनी गठीत केलेल्या समितीसमोर आपले म्हणणे मांडण्याची संधी देवून त्या म्हणण्यासहीत अहवालाबाबत कार्यवाहीचा विषय व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

टिपणी :- व्यवस्थापन परिषदेच्या दि.११/०४/२००७ रोजीच्या सभेतील विषय क्र.१२ नुसार खालील विषयांची चौकशी करण्यासाठी

१. महात्मा फुले मागासवर्गीय बहुउद्देशीय विकास संस्था वाखरी, ता. पंढरपूर या संस्थेस बॅचलर ऑफ नॅचरोपॅथी ॲन्ड योगिक सायन्स पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी दिली.
२. बी. ए. बी. एड. अभ्यासक्रमास व्यवस्थापन परिषदेची मान्यता नसताना मान्यता दिली.
३. शासन, व्यवस्थापन परिषद व शुल्क समितीची मान्यता न घेता बी. एड.चे शुल्क वाढविले.
४. वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील शिक्षक कर्मचाऱ्यांचे विद्यापीठामार्फत प्लेसमेंट झालेले आहे, ती कागदपत्रे महाविद्यालयाशी संबंधित लोक परस्पर घेवून गेले.

प्रा.व्ही.तिरुपती -- अध्यक्ष
प्रा.बी.पी.रोंगे -- सदस्य
प्रा.एन.बी.पवार -- सदस्य

यांची समिती गठीत केली होती. या समितीने चौकशी करुन सादर केलेला अहवाल

दि.२७/१२/२००८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत विषय क्र.१० अन्वये सादर करण्यात आला. यावरील ठरावानुसार माजी कुलगुरुंना वगळून इतर ज्या व्यक्तींवर सदर अहवालामध्ये कारवाई करण्याची शिफारस केलेली आहे अशा व्यक्तींना मा.कुलगुरुंमहोदयांनी गठीत करावयाच्या समितीसमोर आपले म्हणणे मांडण्याची नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार संधी देवून त्या म्हणण्यासहीत अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या आगामी सभेपुढे ठेवण्यात यावा असे ठरले. त्यानुसार मा.कुलगुरु यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली प्रा.एन.बी.पवार, डॉ.सी.बी.कोळेकर, सौ.एन.व्ही.साठे, डॉ.पी.जी.मोरे यांची समिती नियुक्त केली होती.

या समितीने दि. २४/०१/२००८, दि.०४/०२/२००८ सभा घेवून कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या दि.२८/०३/२००८ रोजीच्या सभेपुढे विषय क्र.१४ नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सभेत सादर करण्यात आला होता. दि.२८/०३/२००८ रोजीच्या सभेच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये या विषयाचे कागदपत्रे देण्यात आली आहेत.

सदरचा विषय परत एकदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. ४** **सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या पुढील सभेत सादर करावा असे ठरले.**

**विषय क्र. ५** **संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ यांच्या मानधनाबाबत..**

टिपणी :- संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ यांना सध्या दरमहा रु.३०००/- इतके मानधन अदा केले जात आहे. यापुर्वीचे संचालक हे स्थानिक होते. दि.०१/०८/२००८ पासून संचालक म्हणून प्रा. डॉ. संजय नवले यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. नियुक्त करण्यात आलेले संचालक हे बाहेरगांवचे असल्याने त्यांना विद्यापीठास दररोज बार्शीहून यावे लागते.

सबब, संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ यांच्या वाढीव मानधनाचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ५** **टिपणीमधील " यापुर्वीचे संचालक हे स्थानिक होते. दि.०१/०८/२००८ पासून संचालक म्हणून प्रा. डॉ. संजय नवले यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. नियुक्त करण्यात आलेले संचालक हे बाहेरगांवचे असल्याने त्यांना विद्यापीठास दररोज बार्शीहून यावे लागते." हे वगळावे आणि संचालक विद्यार्थी कल्याण मंडळ व समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना यांचे मानधन रु.४०००/- १ नोव्हेंबर, २००८ पासून करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ६** **वकीलांचे पॅनेल ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी:- विद्यापीठाकडील विविध कोर्ट केसेस, न्यायालयात रिट दाखल करणे, सूट फाईल करणे इत्यादी अनुषंगिक कोर्ट कामाकरीता वकीलांचे पॅनेल ठरविण्यासाठी स्थानिक दैनिक वर्तमानपत्र लोकमतच्या दि. १४/०४/२००८ च्या आवृत्तीमधून जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. या जाहिरातीस अनुसरुन एकूण १० फर्मकडून अर्ज प्राप्त झाले आहेत. सदरचा विषय दि.०४/०९/२००८ रोजीच्या सभेत आयत्या वेळेचा विषय क्र.९(५) अन्वये सादर करण्यात आला होता. ती नांवे खालीलप्रमाणे आहेत.

१) ॲड. श्री. पांढरे व्ही. वाय.
२) ॲड. सौ. कुरनूरकर एस. एस.
३) ॲड. श्री. आळंगे व्ही. एस.
४) ॲड. श्री. कालेकर एस. एस.
५) ॲड. श्री. पाटील व्ही. एन.
६) ॲड. श्री. सलगर बी. एस.
७) ॲड. श्री. गिरीश गोडबोले
८) ॲड. श्री. केतकर आर. जी.

या विषयावरील ठरावनुसार वकीलांचे पॅनेल ठरविण्याकरीता आणखी खालील नावे प्राप्त झाली आहेत.

१) ॲड. श्री. सचिन ढाकेफाळकर
२) ॲड. श्री. संजय दिगंबर ठोकडे
३) ॲड. श्री. गिरीश रमेश अग्रवाल
४) ॲड. श्री. प्रकाश एस. जन्नू
५) ॲड. श्री. वेंकटेश आर. गुंडेली

उपरोक्त नावे वकीलांचे पॅनेल ठरविण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव क्र. ६ **सोलापूर विद्यापीठासाठी वकीलांचे पॅनेल ठरविण्याबाबत खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.**

**अ) जिल्हा व सत्र न्यायालय येथील केसेस करीता वकीलांचे पॅनेल -**
**१) ॲड. श्री. व्ही. वाय. पांढरे**
**२) ॲड. श्री. व्ही. एस. आळंगे**
**३) ॲड. श्री. व्ही. एन. पाटील**
**४) ॲड. श्री. प्रकाश एस. जन्नू**
**५) ॲड. श्री. वेंकटेश आर. गुंडेली**

**ब) उच्च न्यायालय मुंबई येथील केसेस करीता वकीलांचे पॅनेल -**
**१) ॲड. श्री. गिरीश गोडबोले**
**२) ॲड. श्री. आर. जी. केतकर**
**३) ॲड. श्री. सचिन ढाकेफाळकर**
**४) ॲड. श्री. संजय दिगंबर ठोकडे**
**५) ॲड. श्री. गिरीश रमेश अग्रवाल**
**६) ॲड. श्रीमती एस. एस. पटवर्धन पंढरपूर.**

**या वकीलांच्या पॅनेलचा कालावधी ३ वर्षाकरीता असून प्रत्येक वकीलांच्या कामाच्या गुणवत्तेवर पुढील काम द्यावे आणि प्रत्येक वकीलास एकाच केसचे काम द्यावे असेही ठरले.**

**विषय क्र. ७ ग्रंथालय समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

दि.०६/०९/२००८ रोजी ग्रंथालय समितीची सभा झाली या सभेमध्ये झालेले ठराव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा ( xxx v) १९९४ कलम ७५ c- iii आणि iv अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ७ ग्रंथालय समितीच्या दि.०६/०९/२००८ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्त्यांसह वाचून कायम करण्यात आला.**
**१) पान क्र. २० वर, Item No. ४ मध्ये, ओळ क्र. ४ मध्ये, "about Rs. 5-7 Lakhs for books and Rs.7-8 Lakh for journal" ऐवजी "about Rs.7 Lacs and Rs.8 Lacs for journals" अशी दुरुस्ती करावी.**

**विषय क्र. ८ परीक्षा नियंत्रक व वित्त व लेखा अधिकारी निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९ (१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशनाबाबत..**

सोलापूर विद्यापीठाकडील परीक्षा नियंत्रक व वित्त व लेखा अधिकारी पद भरण्याकरिता जाहिरात दिलेली असून सदरचे पद निवडीकरीता असणाऱ्या निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९ (१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ८ विषयामध्ये सुरुवातीला "परीक्षा नियंत्रक" व टिपणीमध्ये सोलापूर विद्यापीठाकडील यानंतर "परीक्षा नियंत्रक" अशी दुरुस्ती करण्यात येऊन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.**
**अ) परीक्षा नियंत्रक निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९(१) (ब) (ii) नुसार -**
**१) प्रा. बी. पी. रोंगे**
**२) प्रा. डॉ. पी. जी. मोरे**
**ब) वित्त व लेखा अधिकारी निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९(१) (ब) (ii) नुसार -**
**१) प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर**
**२) प्रा. डॉ. एल. पी. देशमुख**

**मा.कुलगुरु यांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:-**

**विषय क्र. ९(१)** **सोलापूर विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २००९-१० चा सुधारित बृहत आराखडयाबाबत मा.कुलगुरुसाो यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी.**

**(सोबत सुधारित बृहत आराखडा जोडलेला आहे.)**

टिपणी :- सोलापूर विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २००९-१० चा सुधारित बृहत आराखडा महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३६ (२) प्रमाणे महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीने तयार करुन विद्यापरिषदेस सादर केलेला होता. विद्यापरिषदेने दि.१० सप्टेंबर, २००८ अन्वये सुधारित बृहत आराखडयास ठराव क्र.१५ नुसार दुरुस्तीसह मान्यता दिलेली होती.

सदरचा बृहत आराखडा महाराष्ट्र शासनास मंजुरीसाठी पाठविणे गरजेचे होते. त्यामुळे मा.कुलगुरुसाो यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दि.१२/०९/२००८ रोजी सुधारित बृहत आराखडा मंजुरीसाठी शासनास व मा. कुलपती यांच्याकडे शिफारस केलेली आहे.

सबब, मा. कुलगुरुसाो यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीसाठी.

**ठराव क्र. ९(१)** **सोलापूर विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २००९-१० चा सुधारित बृहत आराखड्याबाबत मा.कुलगुरुसाो यांनी केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. ९(२)** **विधि महाविद्यालय, अकलूज या महाविद्यालयातील विद्यार्थी राजर्षी शाहू महाविद्यालय, बार्शी येथे हस्तांतराबाबत मा.कुलगुरुंनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी.**

टिपणी :- विधि महाविद्यालय,अकलूज या महाविद्यालयाला बार कौन्सिल ऑफ इंडिया यांनी मान्यता दिली नसल्याने व बार कौन्सिल ऑफ इंडिया च्या समितीने विद्यापीठास दि.०६/०९/२००८ रोजी भेट दिली आहे. सदरच्या भेटीप्रसंगी विधि महाविद्यालय, अकलूज च्या प्रवेशित विद्यार्थ्यांना बार कौन्सिल ऑफ इंडियाची सनद मिळणार नाही. हे स्पष्ट केल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार होते त्यामुळे महाविद्यालयाचे संलग्निकरण काढून घेतल्याबाबत विद्यापीठाने पत्र क्र.SOL/UTY/Affi/1290/6959 दि.२९/०९/२००८ च्या पत्रानुसार या महाविद्यालयास आदेश दिलेले आहेत.

तसेच विधि महाविद्यालय, अकलूज या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे

शेक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून मा.कुलगुरु यांनी राजषी्र शाहू लॉ कॉलेज, बार्शी या महाविद्यालयाने संमती दिल्यामुळे विधि महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयात हस्तांतरीत केलेले आहेत.

मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र. ९(२) विधि महाविद्यालय, अकलूज या महाविद्यालयातील विद्यार्थी राजर्षी शाहू महाविद्यालय, बार्शी येथे हस्तांतराबाबत मा.कुलगुरुंनी केलेली कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. ९(३)** Agreement of Co-operation between University of Turin, Italy and Solapur University.

Note:- The Italian Ministry of University and Research (MIUR) and the Indian Ministry of Science and Technology have stipulated MOU dt. 14/2/2005; with the aim of promoting bilateral co-operation between Italy and India; and also communicated vide letter no.1039/2008 to Italian Universities.

Prof. Gianmario Martra, University of Turin, Italy has address letter to the Vice-Chancellor of Solapur University, for co-operation in technological sector of nano-science and nano-technologies to offer the research activities to young Indian researchers of Solapur. The scientific responsibilities will be of Prof. G. Martra for the Indian party and of Prof. N. N. Maldar, for the Indian party.

The University of Turin has committed the following benefits to the selected Indian students / researchers of the university.

1) Controlled cost accommodation.
2) Free Italian language course.
3) Exemption from payment of additional taxes & fees.
4) Medical assistance within the limit and
5) The necessary logistical support.

This will promote and maintain scientific relations and teaching methodologies between two institutes i.e. University of Turin, Italy and Solapur University.

Already few students of Solapur University, who passed M.Sc. [namely Mr. Shivkumar Ghugare; Mr.Shindhrendra Kupal; Mr. Pravin Jagdale; Mr. Sushil Jadhav and Mr. Jijesh Nair] are enroed for higher education in Italy. The agreement will give more opportunities to our students and faculties to work in advanced nano-science & nano-technologies area.

<u>There is no financial commitment of Solapur University;</u> and both institutions have the co-ownership of all scientific and technical results obtained.

This agreement will come into effect on the date of the last signature of the Vice-Chancellor of each institution.

This is for consideration and approval before the Management Council.

**ठराव क्र. ९(३)** **It is resolved that, the Management Council has given its consent to make the Agreement of Co-Operation between University of Turin and Solapur University.**

**विषय क्र. ९(४)** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७६(२)(इ) अन्वये विद्यापीठातील विविध संकुलातील शिक्षक पदांच्या निवड समितीवर विद्या परिषदेने शिफारस केलेल्या तज्ञांच्या पॅनलमधून तीन तज्ञांच्या नावाचे नामांकन करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेस स्नेहदराने अग्रेषित..**

विद्यापीठाने विविध संकुलातील शिक्षक पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द केली आहे त्यामध्ये प्रत्येक पदासाठी विषय विशेषत: दर्शविलेली आहे. त्या अनुषंगाने शिक्षक पदे भरण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७६ (२)(इ) अन्वये विद्या परिषदेने शिफारस केलेल्या तज्ञांच्या पॅनलमधून प्रत्येक संकुलासाठी संबंधित विषय विशेषत: च्या अनुषंगाने तीन विषय तज्ञांचे नामांकन व्यवस्थापन परिषदेने करावयाचे आहे. सोबत जाहिरातीची प्रत आणि विद्या परिषदेने शिफारस केलेल्या तज्ञांचे पॅनल जोडण्यात येत आहे.

सबब, विषय तज्ञांचे नामांकन करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेस सादर.

**ठराव क्र. ९(४)** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७६ (२) (इ) अन्वये विद्यापीठातील विविध संकुलातील शिक्षक पदांच्या निवड समितीवर विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या तज्ञांच्या पॅनलमधून तीन तज्ञांच्या नावाच्या नामांकनाबाबतच्या विषयामध्ये पदार्थविज्ञान करीता प्रा. एस. आय. पाटील पुणे विद्यापीठ यांच्या नावाचा समावेश करावा व इतर विषयाबाबत तज्ञांच्या नावांच्या नामांकनाचे मा.कुलगुरु यांना अधिकार देण्यात यावे असे ठरले.**

**विषय क्र. ९(५)** **सोलापूर विद्यापीठ व करेरा ग्रुप यांचे मध्ये झालेल्या MOU नुसार (EDP) Entrepreneurship Development Programme हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम स्थापन करणेबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.**

टिपणी: सोलापूर विद्यापीठ व करेरा ग्रुप यांचे संयुक्त विद्यमाने वेगवेगळे प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याचे ठरले आहे. MOU नुसार (EDP) Entrepreneurship Development Programme हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम इंग्रजी व मराठी माध्यमातून सुरु करणेची बाब ही दि.१० सप्टेंबर २००८ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.१६(३) प्रमाणे व्यवस्थापन परिषदेस शिफारस करणेत आली आहे. तरी वरीलप्रमाणे

अभ्यासक्रम सुरु करणेसाठी व मान्यतेसाठी विचारार्थ.

**ठराव क्र. ९(५)** **सोलापूर विद्यापीठ व करेरा ग्रुप यांचे मध्ये झालेल्या MOU नुसार (EDP) Entrepreneurship Development Programme हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम स्थापन करण्याबाबत खालील समिती नेमण्यात आली.**

**१) प्रा. डॉ. एन. एन. मालदार**
**२) प्रा. डॉ. पी. बी. जोशी**
**३) डॉ. ए. बी. नारायणपेठकर**
**४) ॲड. रामदास सब्बन**
**५) श्री. पेंटप्पा गड्डम अध्यक्ष सो.जि. यंत्रमाग संघटना मर्या. सोलापूर.**

**या समितीने (EDP) Entrepreneurship Development Programme अभ्यासक्रम सोलापूर विद्यापीठामध्ये सुरु करण्याबाबत आवश्यक त्या बाबींचा अभ्यास करुन व्यवस्थापन परिषदेच्या आगामी सभेत अहवाल सादर करावा असे ठरले.**

**विषय क्र. ९(६)** **परीक्षा विभागाच्या दि.०१/०९/२००८ रोजीच्या टिपणीच्या अनुषंगाने विभागासाठी सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीच्या पुनर्नियोजनाची मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही माहितीसाठी सादर.**

टिपणी :- मा.परीक्षा नियंत्रक यांनी सादर केलेल्या दि.०१/०९/२००८ रोजीच्या टिपणीनुसार परीक्षा विभागाकडील सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी खालील अंदाजपत्रकीय तरतुदीच्या पुनर्नियोजनास मा.कुलगुरु यांनी मान्यता दिलेली असून सदरची कार्यवाही व्यवस्थापन परिषदेस माहितीसाठी सादर.

| Sr.No. | Name of the Budget Head | Original Provision | Re-revised Provision |
|---|---|---|---|
| 1) | Maintenance Budget Department : Examination<br>11. Convocation Expenses<br>a) Printing of Degree/Diploma Certificate | 1,00,000/-<br>(+)1,00,000/-<br>-----------------<br>2,00,000/- | 2,00,000/- |
| 2) | Maintenance Budget Department : Examination<br>11. Convocation Expenses<br>b) Stiching of costumes of convocation | 2,00,000/-<br>(-) 1,00,000/-<br>-----------------<br>1,00,000/- | 1,00,000/- |

**ठराव क्र. ९(६)** **परीक्षा विभागाच्या दि.०१/०९/२००८ रोजीच्या टिपणीच्या अनुषंगाने विभागासाठी सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीच्या पुनर्नियोजनाची मा.कुलगुरु यांनी केलेल्या**

**कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. ९(७)** **भूशास्त्र विभागाच्या दि.१७/०९/२००८ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने विभागासाठी सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीच्या पुनर्नियोजनाची मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही माहितीसाठी सादर.**

टिपणी :- मा.विभागप्रमुख, भूशास्त्र विभाग यांनी दि.१७/०९/२००८ रोजीच्या पत्रानुसार परीक्षा विभागाकडील सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीच्या पुनर्नियोजनास मा.कुलगुरु यांनी मान्यता दिलेली असून सदरची कार्यवाही व्यवस्थापन परिषदेस माहितीसाठी सादर.

| Sr.No. | Name of the Budget Head | Original Provision | Re-revised Provision |
|---|---|---|---|
| 1) | 1. Lab Expenses | 30000/-<br>(-) 5000/-<br>------------------<br>25000/- | 25000/- |
| 2) | 4.Repairs and servicing of furniture equipment | 20000/-<br>(-)10000/-<br>------------------<br>10000/- | 10000/- |
| 3) | 5. Museum | 15000/-<br>(-)10000/-<br>------------------<br>5000/- | 5000/- |
| 4) | 6.Excursion tour | 10000/-<br>(+)35000/-<br>------------------<br>45000/- | 45000/- |
| 5) | 7.Replacement against | 5000/-<br>(-)5000/-<br>------------------<br>0000/- | ---- |
| 6) | 8.Miscellaneous/Contingency | 15000/-<br>(-) 5000/-<br>------------------<br>10000/- | 10000/- |

**ठराव क्र. ९(७)** **भूशास्त्र विभागाच्या दि.१७/०९/२००८ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने विभागासाठी सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीच्या पुनर्नियोजनाची मा.कुलगुरु यांनी केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. ९(८)** **दि.०६/१०/२००८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेसाठी सादर.**

टिपणी :- दि.०६/१०/२००८ रोजी आयोजित केलेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ९(८)** **दि.०६/१०/२००८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ९(९)** **बांधकाम समितीच्या दि.०५ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या सभेतील बांधकाम समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

टिपणी: बांधकाम समितीची दि.०५ नोव्हेंबर, २००८ रोजी सभा झाली. या सभेत बांधकाम समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ९(९)** **बांधकाम समितीच्या दि.०५/११/२००८ रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तांताची व्यवस्थापन परिषेदेने नोंद घेतली आणि खालीलप्रमाणे ठरविण्यात आले.**

**१) नवीन कामापैकी Earth Science इमारतीचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागास करण्यास सांगावे आणि हे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाने माहे एप्रिल २००९ पूर्वी करुन देण्याबाबत सुचित करण्यात यावे.**

**२) अतिथीगृह आणि मुलींचे वसतिगृह विस्तारीत इमारतीचे बांधकाम व भाषा भवन (Language and literature) जुन्या पध्दतीने करावे.**

**विषय क्र. ९(१०)** **तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

टिपणी: तक्रार निवारण समितीने केलेल्या अर्जाची छाननी करुन सदरचे अर्ज तक्रार निवारण समितीपुढे सुनावणीसाठी ठेवण्यात आलेले होते. सदरच्या अर्जावर तक्रार निवारण समितीच्या दि.०५/११/२००८ च्या बैठकीत निर्णय झालेल्या शिफारशी सोबत जोडलेल्या आहेत. सदरच्या शिफारशींना Statute ३३५ अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता आवश्यक आहे. याकरीता तक्रार निवारण समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. ९(१०)** **तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशींना व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ९(११)** **मा.कुलगुरुमहोदय वापरत असलेली ह्युंडाई असेंट विवा MH १३ N ८८८२ या क्रमांकाच्या वाहनाच्या विक्रीबाबत.**

टिपणी: मा.कुलगुरुमहोदय वापर असलेली ह्युंडाई असेंट विवा MH १३ N ८८८२ या क्रमांकाचे वाहन नवीन वाहन खरेदी केल्यामुळे विक्री करणे गरजेचे आहे. सदर बाबत स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहीर निविदा प्रकाशित करण्यात आली होती.

सदर निविदेस अनुसरुन १ निविदा मे. राहूल ह्युंडाई सोलापूर यांचेकडून प्राप्त झाली आहे. सदर गाडीचे मूल्यांकन हे शासनमान्य Valuator कडून करुन घेतलेले आहे त्यांनी ठरविलेले मूल्य रक्कम रु.२.६० लक्ष आहे.

सदर बाबत विक्री समितीची बैठक दि.०७/११/२००८ रोजी आयोजित केली होती. वरील बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेसाठी व्यवस्थापन परिषदेस सादर.

**ठराव क्र. ९(११)** **विक्री समितीच्या दि.०७/११/२००८ रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ९(१२)** **श्री. एच. आय. राऊत व श्री. आर. जी. भोरकडे यांना धारणाधिकार (Lien) मंजूर करण्याबाबत.**

टिपणी: श्री. एच. आय. राऊत पदार्थविज्ञान विभागामध्ये प्रयोगशाळा सहाय्यक पदावर आणि श्री. आर. जी. भोरकडे प्रयोगशाळा सहाय्यक पदावर रसायनशास्त्र विभागामध्ये कार्यरत आहेत. श्री. एच. आय. राऊत आणि श्री. आर. जी. भोरकडे यांची सहाय्यक अधीक्षक या पदावर सोलापूर विद्यापीठामध्ये सरळसेवेद्वारे नियुक्ती झाली आहे. त्यांनी त्यांच्या पूर्वीच्या प्रयोगशाळा सहाय्यक पदाचा धारणाधिकार (Lien) मंजूर करण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. ९(१२)** **श्री. एच. आय. राऊत यांना प्रयोगशाळा सहाय्यक व श्री. आर. जी. भोरकडे यांना प्रयोगशाळा सहाय्यक या पदाचा २ वर्षाकरीता धारणाधिकार (Lien) देण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. ९(१३)** **डॉ. आर. एन. जाधव समन्वयक भारतीय पुरातन इतिहास संस्कृती व पुरातत्व विभाग यांच्या मानधनाबाबत.**

टिपणी: डॉ. आर. एन. जाधव पूर्वाश्रमीच्या शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षण केंद्रापासून भारतीय पुरातन इतिहास संस्कृती व पुरातत्व विभागामध्ये समन्वयक या पदावर कार्यरत आहे. त्यांना रु.३५००/- इतके मानधन दिले जाते. व्यवस्थापन परिषदेच्या दि.२७/१२/२००७ रोजीच्या सभेतील विषय क्र. २४ अन्वये त्यांचे मानधन रु.५०००/- इतके करण्यात आले होते. परंतु त्यांच्या सध्याच्या कामाचा अनुभव लक्षात घेता त्यांना देण्यात येणारे मानधन अत्यंत अपुरे असल्याचे दिसते. डॉ. आर. एन. जाधव समन्वयक भारतीय पुरातन इतिहास संस्कृती व पुरातत्व विभाग यांचे मानधन वाढविण्याबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या

विचारार्थ.

ठराव क्र. ९(१३) डॉ. आर. एन. जाधव समन्वयक भारतीय पुरातन इतिहास संस्कृती व पुरातत्व विभाग यांचे एकत्रित मानधन दि. १ नोव्हेंबर, २००८ पासून रु.८०००/- करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.

विषय क्र. ९(१४) मा. राज्यमंत्री श्री. सुरेश शेट्टी यांनी विधानपरिषदेमध्ये शिवाजी विद्यापीठाकडे जमा असलेल्या निधीमधून सोलापूर जिल्ह्याचा हिस्सा म्हणून येणारी रक्कम देण्याबाबत दिलेले आश्वासन व त्या अनुषंगाने मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी विद्यापीठास पाठविलेले पत्र व व्यवस्थापन परिषदेच्या दि.०४/०९/२००८ रोजी विषय क्र. ६ वरील ठरावास अनुसरुन दि.११/०९/२००८ रोजी मा.कुलगुरु शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्यासमवेत झालेल्या बैठकीबाबत.

ठराव क्र. ९(१४) व्यवस्थापन परिषदेच्या सन्माननीय सदस्यांच्या विनंतीवरुन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या दि.३१/०३/२००४ चे ताळेबंदपत्रक सभेपुढे ठेवण्यात आले. सोलापूर विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या दोन्ही विद्यापीठांच्या कुलगुरुंच्या दि.११/०९/२००८ रोजी झालेल्या कार्यवृत्तांताचे व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या दि.३१/०३/२००४ च्या ताळेबंदपत्रकाचे अवलोकन करुन खालील बाबींची नोंद घेण्यात आली.

१) दि.११/०९/२००८ च्या बैठकीच्या कार्यवृत्तांतामधील मुद्दा क्रं. १ "शिवाजी विद्यापीठाकडे कोणत्याही स्वरुपाचा राखीव निधी नाही. तसेच जी बचत आहे ती ज्या त्या निधीची आहे. याशिवाय अन्य बचत नाही" हा मुद्दा दिशाभूल करणारा आहे.

२) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे दि.३१/०३/२००४ चे ताळेबंदपत्रक पाहता, त्या तारखेस शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्याकडे एकूण निधी रु.७२,०८,५१,९७३.३१/- इतका असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निधीचे नाव | | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1) | विद्यापीठ निधी (Funds) | | 52,89,90,463=03 |
| 2) | घसारा निधी (Depreciation Fund) | | 12,59,74,626=64 |
| 3) | Surplus | | 3,14,335=89 |
| 4) | Agency Scheme<br>(Debit balance (-) Credit balace) | | 6,55,72,547=75 |
| | Debit balance | 1,32,17,423.86=00 | |
| | Credit Balance | 7,87,89,971.61=00 | |
| | | **एकूण रुपये** | **72,08,51,973=31** |

सदर रकमेपैकी सोलापूर विद्यापीठाचा १/४ हिस्सा रु.१८,०२,१२,९९३.३२/- म्हणजे पूर्णांकात रु.१८,०२,१२,९९३/- इतका येतो. वरील बाबींचा विचार करुन सर्वानुमते खालीलप्रमाणे ठरविण्यात आले.

१) सदर दि.११/०९/२००८ च्या दोन्ही विद्यापीठाच्या कुलगुरुंच्या बैठकीतील मुद्दा क्र. १ "शिवाजी विद्यापीठाकडे कोणत्याही स्वरुपाचा राखीव निधी नाही. तसेच जी बचत आहे ती ज्या त्या निधीची आहे. याशिवाय अन्य बचत नाही" हे मान्य नाही.

२) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या दि.३१/०३/२००४ च्या ताळेबंदपत्रकातील निधीपैकी वर उल्लेखिलेल्या सोलापूर विद्यापीठाच्या हिश्याची रक्कम रु.१८,०२,१२,९९३/-मा.मंत्रीमहोदयांच्या विधानपरिषदेस दिलेल्या आश्वासनाप्रमाणे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडून सोलापूर विद्यापीठास लवकरात लवकर मिळावी अशी परत एकदा महाराष्ट्र शासनास विनंती करण्यात यावी व त्यासोबत हा विषय व त्या अनुषंगाने केलेले ठराव तसेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या दि.३१/०३/२००४ च्या ताळेबंदपत्रकाची प्रत शासनास पाठवून द्यावी.

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे मा.कुलसचिव यांनी जाहीर केले.

सही/-
एम.एस.शेजूळ
सचिव, व्यवस्थापन परिषद

सही/-
बी. पी. बंडगर
अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद